N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. सांगली
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/09/2023 16:04
2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date From (दिनांक पासून):** 29/08/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/08/2023
      **Time From (वेळेपासून):** 15:14 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 16:10 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 20/09/2023 **Time (वेळ):** 15:32 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 014
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/09/2023 15:32 बजे
4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** भारत सुतगिरणीचे गेट समोर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदीप भुपाल गोसावी
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राजवाडा समोर,श गोसावी गल्ली, बुधगांव,ता मिरज,एम.आई.डी.सी. सांगली, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राजवाडा समोर,श गोसावी गल्ली, बुधगांव,ता मिरज,एम.आई.डी.सी. सांगली, सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9890623537

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश नवाळे | | | 1. कषी कलनी सांगली,ता मिरज, एम.आई.डी.सी. सांगली, सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | | 30,000.00 |



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 20/09/2023

मी संदीप भुपाल गोसावी, वय-41 वर्षे व्यवसाय-व्यापार, रा.गोसावी गल्ली, बुधगांव, राजवाड¬ा समोर, ता. मिरज जि.सांगली मो.नं.9890623537

मी वरील ठिकाणी मी माझे आई वडील, पत्नी रंजना, तीन मुले, दोन भाऊ सुखदेव व प्रकाश त्यांची पत्नी व मुले असे सर्व एकत्रीत राहणेस आहे. माझा फळ खरेदी विक्री व स्क्रॅपचा व्यवसाय आहे. माझे बुधगांव वॉर्ड नं 2 मध्ये मिळकत नं.1495/8 या मध्ये दुमजली घर असुन सदरचे घर हे मी व माझा भाऊ प्रकाश भुपाल गोसावी यांचे नावे 2018 मध्ये खरेदी केले होते. मी व भाऊ प्रकाश एकत्रात राहणेस आहे. सदर घराची कायमस्वरुपी खरेदीपत्र करुन देणेचे ठरविले असुन त्याकरिता ग्रामपंचायत बुधगांव यांचेकडुन घर जागेचे मुल्यांकन करुन खरेदी विक्री नाहरकत दाखला आवश्यक आहे.

बुधगांव ग्रामपंचायत मार्फत गांवा मध्ये जागेच्या मुल्यांकनाचे काम सुरु असल्याने मी ग्रामविकास अधिकारी नांद्रे, तत्कालीन अतिरिक्त कार्यभार बुधगांव श्री.उमेश नवाळे यांना 2-3 वेळा भेटुन मी त्यांना माझे घर जागेचे मुल्यांकन करणेचे असले बाबत बोललो होतो.

दिनांक 22/08/2023 रोजी नवाळे आण्णासाहेब यांनी दुपारी 2.00 वा.चे सुमारास माझे मोबाईलवर कॉल करुन घर जागेच्या मुल्यांकना संदर्भात सांगली कोर्टा जवळ विजयनगर येथे भेटण्यासाठी बोलविले. तेव्हा मी व आमचे स्क्रॅप गोडावुन मधील कामगार मोहसीन सय्यद असे दुपारी 2.30 वा.चे सुमारास सांगली कोर्ट येथे आलो असता तेथे आमचे गावातील लोक हजर असल्याने नवाळे आण्णासाहेब यांनी टाटा पेट्रोल पंप चंदुकाका सराफ दुकाना जवळ येण्यास सांगुन ते निघुन गेले. मी व मोहसीन सय्यद माझे मोटार सायकल वरुन टाटा पेट्रोल पंप, चंदुकाका सराफ दुकाना जवळ गेलो असता नवाळे आण्णासाहेब यांनी माझेशी माझे घर जागेच्या मुल्यांकना बाबत चर्चा करुन तुमच्या घर जागेच्या मुल्यांकना मध्ये जुने गांवठाणचा खरेदी विक्रीचा नाहरकत दाखला दिल्यास तुम्हाला स्टॅम्प ड¬ुटी मध्ये तुमचे लाखभर रुपये वाचतील. मी तुम्हाला जुने गांवठाणचा खरेदी विक्रीचा नाहरकत दाखल देतो, मला तुम्ही 50,000/- रुपये द्या असे म्हणुन लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना 50,000/- रुपये देण्या इतपत माझी ऐपत नाही असे म्हणालो. तेव्हा त्यांनी मला मुल्यांकनाचा नाहरकत दाखला मिळणे बाबत अर्ज करणेस सांगुन ते दिनांक 26/08/2023 रोजी नांद्रे येथे जाणार असुन तुम्ही सकाळी 10.30 वा.पर्यंत भो-या म्हसोबा जवळ नांद्रे रोडला येवुन थांबा असे सांगुन निघुन गेले.

त्यानंतर मी माझे घर जागेचे मुल्यांकन करणे करीता आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडुन मा.ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत बुधगांव यांचे नावे अर्ज तयार करुन दिनांक 24/08/2023 रोजी मला काम असलेने आमचे स्क्रॅप गोडावुन मधील कामगार बशीर मुलाणी यांचे मार्फत ग्रामपंचायत बुधगांव येथे अर्ज देवुन पोहोच घेतली आहे.

दिनांक 26/08/2023 रोजी सकाळी 09.30 वा.चे सुमारास मी ग्रामविकास अधिकारी यांना माझे मोबाईल वरुन फोन केला असता त्यांनी ठरलेल्या ठिकाणी भो-या म्हसोबा मंदिरा जवळ या असे सांगितले त्याप्रमाणे मी 10.30 वा चे सुमारास मी व आमचे स्क्रॅप गोडावुन मधील कामगार मोहसीन सय्यद असे तेथे जाऊन थांबलो असता 10.45 वा.चे सुमारास नवाळे आण्णासाहेब आमचे जवळ आले. त्यावेळी नवाळे आण्णासाहेब यांनी माझा मित्र मोहसीन सय्यद यांस बाजुला जाऊन थांबवण्यास सांगुन माझा व त्यांचा मोबाईल स्विच ऑफ करुन मित्रा जवळ देण्यास सांगितला. त्यानंतर आमचे मध्ये मुल्यांकना बाबत चर्चा झाली त्यांनी एका कागदावर त्यांचे स्वता:चे हस्ताक्षरात माझे ग्राम पंचायत मिळकत नंबर व खरेदी विक्रीचा नाहरकत दाखला असे लिहुन त्यांचे मोबाईलवर फोटो घेतला खरेदीपत्रासाठी लागणारा उतारा व बँक कामासाठी लागणारे उतारे असे मला आणुन देतो असे म्हणाले तेव्हा मी त्यांना यासाठी वेगळा अर्ज देवु का असे म्हणालो असता त्यांनी काही गरज नाही असे सांगितले. त्यानंतर नवाळे आण्णासाहेब यांनी माझ्या घर जागेच्या मुल्यांकना मध्ये जुने गांवठाणचा खरेदी विक्रीचा नाहरकत दाखला दिल्यास



Scanned with OKEN Scanner

तुम्हाला स्टॅम्प ड¬ुटी मध्ये लाखभर रुपये वाचणार आहेत, त्यामुळे मी तुम्हाला जुने गांवठाणचा खरेदी विक्रीचा नाहरकत दाखल देतो, तुमचे स्टॅम्प खरेदी मध्ये पैसे वाचणार आहेत, त्यामुळे तुम्हाला 50,000/- रुपये मला द्यायला काय अडचण नाही असे म्हणुन पुन्हा लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना 50,000/- रु देण्या इतपत माझी ऐपत नाही असे म्हणुन त्यांना बरीच विनंती केली असता त्यांनी 40,000/- रु द्या असे म्हणुन लाचेची मागणी केली. तेव्हा त्यांनी मला मी सोमवारी संध्याकाळ पर्यत तुम्हाला दाखला देतो तुम्ही पैश्याची व्यवस्था करा असे म्हणुन ते निघुन गेले.

उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी बुधगांव हे आज रोजी संध्याकाळी मला माझे राहते घराचा मुल्यांकनाचा नाहरकत दाखला देण्यासाठी भेटणार आहेत व मुल्यांकनाचा नाहरकत दाखला देताना मला पुन्हा लाचेची मागणी करणार व माझा मुल्यांकनाचा नाहरकत दाखला लाच दिल्या शिवाय देणार नाहीत अशी माझी खात्री आहे. उमेश नवाळे ग्रामविकास अधिकारी यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.27/08/2023 रोजी सांयकाळी 19.30 वा चे सुमारास पोलीस निरीक्षक भिलारे अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना माझी तक्रार फोनवरुन सांगितले तेव्हा त्यांनी मला दिनांक 28/08/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक 28/08/2023 रोजी 10.34 वा. अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे गेलो असता पोलीस निरीक्षक भिलारे साहेब यांनी मला लेखी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी अर्ज दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक भिलारे साहेब यांनी दोन सरकारी पंच अॅन्टी करप्शन कार्यालयात बोलावुन घेऊन मला सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करुन दिली. भिलारे साहेब यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली. त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक भिलारे साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्रा केल्या.

त्यानंतर उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी बुधगांव यांचे विरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. विनायक पाटील यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. उमर जमादार यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच विनायक पाटील असे माझेकडील मोटार सायकल रवाना होवून नांद्रे ग्रामपचायत येथे गेलो असता उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी बुधगांव हे कार्यालयात नसल्याने त्यांची भेट न झाल्याने आम्ही पुन्हा परत अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे आलो. उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी बुधगांव यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांचा मोबाईल बंद लागत असल्याने आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे थांबुन राहिलो त्यानंतर भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष ऊद्ईक रोजी पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्याप्रमाणे दिनांक 29/08/2023 रोजी 09.50 वा अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे आलो दोन्ही पंच ही कार्यालयात हजर झाले. ग्रामविकास अधिकारी नवाळे यांचा सकाळी 09.00 वा चे सुमारास मिस्ड कॉल येवुन गेला असल्याचे भिलारे साहेब यांना सांगितले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच विनायक पाटील असे माझेकडील मोटार सायकल रवाना होवून नांद्रे ग्रामपंचायत येथे जाणे करिता निघालो असता रस्त्यामध्ये ग्रामविकास अधिकारी नवाळे यांचा फोन आला व त्यांनी दुपारी 2.30 वा.फोन करतो असे सांगितलेने त्यांची भेट होवु शकली नाही. म्हणुन आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे आलो. दुपारी 2.30 वा.चे सुमारास भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला व ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे यांचेकडे पडताळणी करिता पाठविले असता त्यांचा माझे मोबाईलवर फोन आला परंतु मी फोन उचले पर्यंत त्यांचा फोन कट झालेने मी त्यांना कॉल केला असता त्यांनी पालवी हॉटेल रस्त्यास हॉटेल पिंक स्टार जवळ येण्यास सांगितले तेव्हा मी पंच पाटील यांचेसह पालवी हॉटेल रस्त्यास पिंक स्टार हॉटेल जवळ गेलो असता तेथे ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे दिसुन न आलेने मी त्यांना कॉल केला असता त्यांनी भारत सुत गिरणी जवळ येण्यास सांगितले, म्हणुन मी पंचा सह भारत सुत गिरणी जवळ गेलो असता कुपवाड रस्त्यास भारत सुत गिरणीच्या गेट समोर ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे हे उभे असलेले दिसले म्हणुन मी मोटार सायकल त्यांचे जवळ नेऊन थांबविली त्यानंतर ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे यांनी मुल्यांकन करुन खरेदी विक्री नाहरकत दाखला बाबत चर्चा करुन श्री.नवाळे यांनी हाताने इशारा करुन पैशाची मागणी केली त्यावेळी मी चाळीस हजार रुपये जास्त होत्यात असे म्हणालो असता ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे यांनी "ठिक हाय आता विषय राऊदे हित हित विषय



Scanned with OKEN Scanner

बोलायला नको पाच वाजता येतो सगळ तयार करतो या" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना तरी काय असे म्हणालो असता त्यांनी "हे मोबाईल बिबाईल अस उगच बोंब नको" असे म्हणालेने मी माझा मोबाईल त्यांचेकडे दिला तेव्हा त्यांनी माझा व त्यांचा मोबाईल शासकिय पंच यांचेकडे देवुन त्यांना थोडे बाजुला लांब जावा असे म्हणाले तेव्हा पंच बाजुला गेले नंतर ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे यांनी "किती देतोय म्हणतोय" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना न्हाय चाळीस हजार रुपये जादा होत्यात असे म्हणालो तेव्हा ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे यांनी "किती देतोय मग...... तीस करा आणि सोडुन द्या विषय" असे म्हणाले तेव्हा मी किती म्हणालो असता त्यांनी पुन्हा "तीस" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना साहेब काय अॅडजेस्टमेंट होणार न्हाय आणि असे म्हणालो तेव्हा त्यांनी "बघु करूया कि आपण करूया कि" "मी आज दाखला तयार करून येतो संध्याकाळी.. जाऊया मला वेळ होईल असे म्हणाले" तेव्हा मी त्यांना फोन करा असे म्हणालो व पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय सांगली येथे आलो. भिलारे साहेबांनी मला व पंच पाटील यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग एकुण वरील प्रमाणे संभाषण झाल्याची खात्री केली.

त्यानंतर ग्रामविकास अधिकारी श्री.नवाळे यांचा फोन आले नंतर सापळा कारवाई करणेचे निश्चीत करुन त्यांचा फोन येईल याकरिता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालया येथे वाट पाहिली परंतु त्यांचा फोन आला नाही. दरम्यान भिलारे साहेबांनी पडताळणी कारवाईची इतर कारवाई ही अॅन्टी करप्शन कार्यालयात पुर्ण केली. त्यानंतर ग्रामविकास अधिकारी नवाळे यांनी लाच रक्कम घेवून येण्यास सांगितल्यास तात्काळ आपणास संपर्क करणे बाबत सुचना दिल्या. तसेच मला व दोन्ही पंच यांना कारवाई बाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना दिल्या.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
NAMDEV BABASO KAMALAKAR
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 1240100362NBK
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S.B. Gosavi

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

S.B. Gosavi

प्रत मिळाली

पोलीस स्टेशन ऑफीसर
M.I.D.C. कुपवाड पोलीस ठाणे

**Signature of Officer in Charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Avinash Anand Patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402



Scanned with OKEN Scanner